## सरळसेवा नोकर भरतीबाबतची विस्तृत जाहिरात
### (क्लेरिकल, वाहनचालक व सुरक्षा रक्षक पदाकरीता)

दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर यांच्या आस्थापनेवरील व अधिपत्त्याखाली असलेले सेवकमांडनुसारचे रिक्त पदे सरळसेवा पध्दतीने भरणेसाठी बँकेने दिनांक १२.९.२०२४ रोजीच्या दैनिक 'सकाळ' व 'लोकमत' या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून जाहिरातीतील पदे भरण्याकरीता बँकेस निवडसूची तयार करावयाची आहे. याकरीता पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात केवळ ऑनलाईन पध्दतीने बँकेच्या www.adccbanknagar.org किंवा भरतीच्या अधिकृत www.adccbanknagar.in या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर परिक्षा शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरणे दिनांक व वेळ | १३ सप्टेंबर २०२४ ते २७ सप्टेंबर २०२४ सायंकाळी ५.०० पर्यंत |
| २ | ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ३ | ऑनलाईन परिक्षा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४ | कागदपत्रे पडताळणी व मुलाखत दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |

**भरावयाची श्रेणीनिहाय पदे :**

| अ.नं. | श्रेणी | भरावयाची पदे |
|---|---|---|
| १ | क्लेरिकल | ६८७ |
| २ | वाहनचालक (सबॉर्डिनेट 'ए') | ०४ |
| ३ | सुरक्षा रक्षक (सबॉर्डिनेट 'बी') | ०५ |

**टीप :**

१) सदर पदांमध्ये कमी-जास्त बदल होण्याचा संभव आहे व याबद्दल उमेदवाराची कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही. हे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत. पदाच्या संख्येत बदल झाल्यास, त्याची माहिती बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

२) सर्व पदांसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज भरण्याची प्रक्रिया व परिक्षा घेण्यात येईल.

३) उपरोक्त सर्व पदांसाठी कोणत्याही प्रकारचे सामाजिक व समांतर आरक्षण लागू असणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४) निवड यादीमध्ये नांव असले तरी उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क सांगता येणार नाही. उमेदवाराची निवड कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहून करण्यात येईल, याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

**वेतन श्रेणी :**

| पद | मूळ वेतन श्रेणी रूपये |
|---|---|
| क्लेरिकल | २२८-१५-३०३-२०-४०३-२५-४७८-३०-५६८-३५-७४३-४०-९४३-५०-११९३-६५-१५१८ |
| **वाहनचालक (सबॉर्डिनेट 'ए')** | १९०-१५-२६५-२०-३६५-२५-४९०-३०-५८०-३५-६८५-४०-८८५-५०-११३५-६५-१४६० |
| **सुरक्षा रक्षक (सबॉर्डिनेट 'बी')** | १७५-१०-२२५-१५-३००-२०-४००-३०-४९०-३५-५९५-४०-७९५-४५-१०२०-५०-१२७० |

**शैक्षणिक पात्रता व अनुभव :**

उमेदवाराने खाली नमुद केलेली शैक्षणिक अर्हता (उमेदवाराने आवश्यक शैक्षणिक अर्हता दिनांक १२.९.२०२४ पुर्वी प्राप्त केलेली नसल्यास, कागदपत्र पडताळणीवेळी सदरहू उमेदवार पात्र ठरणार नाही, याची नोंद घ्यावी), अनुभव व वय हे दिनांक १२.९.२०२४ रोजी प्रमाणपत्रासहित पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ. नं. | पद व वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता | आवश्यक अनुभव | प्राधान्य |
|---|---|---|---|---|
| १ | क्लार्क<br>**(वय वर्षे २१ ते४०)** | कोणत्याही शाखेचा पदवीधर (मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किमान ५०% गुण मिळवुन उत्तीर्ण असावा अथवा किमान 'ब' श्रेणी धारण करून उत्तीर्ण असावा) महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT<br>**किंवा**<br>D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तरापैकी कोणतेही एक परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक | - | एम.कॉम./एम.बी.ए. (बँकींग किंवा फायनान्स)/एम.एस.सी. (अॅग्री)/एलएल.बी./ एलएल.एम./डी.टी.एल. (Diploma in Taxation Laws)/जीडीसीअॅण्डए/ सीएआयआयबी/ जेएआयआयबी/ बँकेतील कामकाजाचा किमान तीन वर्षांचा अनुभव |
| २ | वाहनचालक (सबॉर्डिनेट 'ए') (फक्त पुरूष)<br>**(वय वर्षे २१ ते ४०)** | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाची कोणत्याही शाखेची एस.एस.सी. (१० वी) परिक्षा उत्तीर्ण, उमेदवाराकडे जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस मोटार वाहन अधिनियम १९८८ (क्र.५९/१९८८) प्रमाणे वैध व कार्यरत असा किमान हलके मोटार वाहन (एल.एम.व्ही.) चालविण्याचा परवाना (Driving Licence) असावा. | १. उमेदवारास अर्ज करण्याच्या तारखेस किमान ३ वर्षे हलके वाहन किंवा जड वाहन चालविण्याचा अनुभव असावा.<br>२.उमेदवाराचा वाहन चालविण्याचा पूर्व कार्यकाळ (Past Record) स्वच्छ असावा.<br>३.उमेदवारास मोटार वाहनाची सर्वसाधारण देखभाल व दुरूस्तीचे ज्ञान असावे.<br>४.उमेदवार शारिरीक दृष्टया सदृढ व निर्व्यसनी असावा.<br>५.उमेदवारास मराठी, हिंदी भाषा लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक राहील. | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | सुरक्षा रक्षक (सबॉर्डिनेट 'बी') (फक्त पुरूष) **(वय वर्षे २१ ते ४५)** | कोणत्याही शाखेचा पदवीधर (मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी) किंवा आर्मी ग्रॅज्युएट (Ex-Servicemen) | उमेदवार माजी सैनिक असल्यास, त्याचे वय जाहिरात दिनांक प्रसिध्द झालेच्या रोजी अधिकतम वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. | बँक सुरक्षा रक्षक म्हणून किमान ३ वर्षांचा अनुभव, गन लायसन्स असल्यास प्राधान्य |

**टीप :**

१) क्लेरिकल पदांच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये उमेदवार हा बी.ई (कॉम्प्युटर/आयटी/ईअँडटीसी), बी.एससी (कॉम्प्युटर) इ. असल्यास, त्यास एम.एस.सी.आय.टी. व तत्सम अर्हतेची आवश्यकता नाही.

**ऑनलाईन अर्ज व परिक्षा शुल्क भरण्याची पध्दत :**

१) उमेदवाराने सर्वप्रथम संकेत स्थळावरील विस्तृत माहिती (Advertisement) व सूचना (How to Apply) वाचुन घ्याव्यात. त्यानंतर ऑनलाईन नोंदणी (New Registration) या लिंकवर क्लिक (Click) करावे. उमेदवारांनी आपली ऑनलाईन नोंदणी करून जाहिरातीत दिलेल्या सूचनांचे अवलोकन करून ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्याची खात्री केल्यानंतर ऑनलाइन परिक्षा शुल्क भरावे. परिक्षा शुल्क भरल्यानंतर अर्ज दुरूस्त करण्याची सुविधा उपलब्ध असणार नाही.

२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चे अद्ययावत "JPG/PNG" याप्रकारचे स्कॅन केलेले छायाचित्र (Plain Background) व दोन्ही कान स्पष्टपणे दिसतील असे (Photo) व पांढ-या स्वच्छ कागदावर काळया शाईच्या पेनने स्वतः स्वाक्षरी करून स्कॅन केलेली "JPG/PNG" प्रकारची स्वाक्षरी(Signature) स्कॅन करून www.adccbanknagar.org किंवा भरतीच्या www.adccbanknagar.in संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. (छायाचित्र व स्वाक्षरीच्या स्कॅन केलेले ईमेजची फाईल साईज 2MB पर्यंत एमबी असावी. तसेच स्वाक्षरी स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज 2MB पर्यंत असावी. त्यापेक्षा मोठी फाईल अपलोड होणार नाही)

३) उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना स्वत:चे आधारकार्ड "JPG/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन करून www.adccbanknagar.org या संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. आधारकार्ड स्कॅन केलेल्या ईमेजची साईज 2MB पर्यंत असावी.

४) वर नमुद पदांकरीता फक्त बँकेच्या www.adccbanknagar.org किंवा भरतीच्या www.adccbanknagar.in या अधिकृत संकेतस्थळावरून विहीत ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

५) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना स्वत:चा ई-मेल आय.डी., मोबाईल क्रमांक व आधारकार्ड क्रमांक अचूक नमुद करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपूर्ण, तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना एजन्सी किंवा बँक जबाबदार असणार नाही. त्यामुळे उमेदवाराने सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहाण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.



The Ahmednagar District Central Co-op. Bank Ltd. R. No. 24910 Dt. 3/10/1957 Head Office Ahmednagar

६) उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज बँकेच्या www.adccbanknagar.org किंवा भरतीच्या www.adccbanknagar.in या वेबसाईटद्वारे दिनांक १३.९.२०२४ ते दिनांक २७.९.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

७) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्र/पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे.

८) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.

९) ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.

१०) जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा वगैरेची पात्रता तपासूनच उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरावा.

११) उमेदवाराची ऑनलाईन परिक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहाणार नाहीत.

१२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना बँकेच्या www.adccbanknagar.org किंवा भरतीच्या www.adccbanknagar.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१३) ऑनलाईन परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक १३.९.२०२४ रोजी सकाळी १०.३० पासुन ते दिनांक २७.९.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर संकेतस्थळावर अर्ज भरण्याची लिंक बंद करण्यात येईल.

१४) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना स्वत:ची पूर्ण माहिती ही अचूक भरावी.

**परिक्षा शुल्क :**

| शुल्क | क्लेरिकल | वाहनचालक | सुरक्षा रक्षक |
|---|---|---|---|
| रक्कम रूपये | ६३५.०० | ५९०.०० | ५९०.०० |
| जीएसटी (१८%) | ११४.०० | १०६.०० | १०६.०० |
| **एकूण** | ७४९.०० | ६९६.०० | ६९६.०० |

R.No. 24010 Dt. 3/10/1957 Head Office Ahmednagar

सदर परिक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

**परिविक्षाधिन कालावधी :**

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना प्रथम एक वर्षासाठी परिविक्षाधिन सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधिन कालावधीमध्ये श्रेणीनिहाय खालीलप्रमाणे दरमहा संकलीत पगार देण्यात येईल. उमेदवारास बँकेच्या सेवेत कायम केल्यानंतर कायम सेवकाप्रमाणे पगार व भत्ते अदा केले जातील.

| संकलित | क्लेरिकल | वालनचालक | सुरक्षा रक्षक |
|---|---|---|---|
| पगार रूपये | १५०००/- | १२०००/- | १२०००/- |

**निवड कार्यपध्दती :**

सर्व श्रेणीतील पदांकरिता १०० गुणांपैकी ९० गुणांसाठी संगणकाद्वारे ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील. ऑनलाईन परिक्षा ९० प्रश्नांची असुन प्रत्येक प्रश्नास १ गुण असणार आहे. या ऑनलाईन परिक्षेसाठी ९० मिनीटांचा कालावधी राहील. ऑनलाईन परिक्षेसाठी बँकिंग व सहकार, सामान्यज्ञान व चालू घडामोडी, कृषि व ग्रामीण अर्थव्यवस्था, मराठी, इंग्रजी, गणित, संगणक, माहिती तंत्रज्ञान व बौध्दिक चाचणी विषयाच्या विस्तृत अभ्यासक्रमावर आधारीत प्रश्नंचा समावेश असेल. ऑनलाईन परिक्षेचे माध्यम मराठी असेल.

१) ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कागदपत्रे पडताळणी करीता पात्र उमेदवारांचे आसन क्रमांकाची यादी नोकरभरतीच्या www.adccbanknagar.in व बँकेच्या www.adccbanknagar.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल.

२) कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल.

३) सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास, त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

४) परिविक्षाधिन कालावधी (Probation Period) - निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना प्रथम एक वर्षासाठी परिविक्षाधिन (प्रोबेशन) सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधिन कालावधीत उपरोक्त प्रमाणे श्रेणीनिहाय दरमहा संकलित वेतन देण्यात येईल. या कालावधीतील कामकाज व वर्तणूकीबाबतचा अहवाल विचारात घेऊन बँकेच्या सेवेत कायम करणेबाबत विचार करण्यात येईल.

५) नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यक ती मूळ कागदपत्रे इत्यादीची पडताळणी संबंधीत प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. कागदपत्र/प्रमाणपत्र पडताळणीअंती उमेदवाराने सादर केलेल्या कागदपत्र/ प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/माहिती खोटी आढळल्यास, अशा उमेदवारास कुठल्याही टप्प्यावर नियुक्ती दिली जाणार नाही/नियुक्ती रद्द होईल.

६) उमेदवारांना दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. यांचे आदेशास अधिन राहून बँकेच्या कोणत्याही शाखा/कार्यालयामध्ये नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १५ दिवसांचे आंत रूजू होणे आवश्यक राहील.

**कागदपत्र पडताळणी :**

१) ऑनलाईन परिक्षेत प्राप्त होणाऱ्या गुणांच्या गुणानुक्रमे उपरोक्त नमुद पदसंख्येच्या १:३ प्रमाणानुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी (परिक्षेचा बैठक क्रमांक) बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

२) मुलाखतीस पात्र उमेदवारांस शैक्षणिक व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्राची पडताळणी बँकेकडून करून घेणे बंधनकारक राहील.



The Ahmednagar District Central Co-op. Bank Ltd. R.No. 24910 Dt. 3/10/1957 Head Office Ahmednagar

३) उमेदवाराने कागदपत्रे/प्रमाणपत्राची मुळ प्रत व एक प्रमाणित झेरॉक्स प्रत पडताळणीचेवेळी बँकेस सादर करणे अनिवार्य आहे.

४) कागदपत्रांचा तपशिल :

| श्रेणी | कागदपत्रांचा तपशिल |
|---|---|
| क्लेरिकल | उमेदवाराने ऑनलाईन अर्जात उल्लेख केलेली सर्व शैक्षणिक व अनुभवाच्या कागदपत्रांची मुळ व एक झेरॉक्स प्रमाणित प्रत, विवाहीत महिलांच्या बाबतीत नावात बदल झालेबाबतचा पुरावा (महाराष्ट्र शासन राजपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र), जन्मतारखेचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला/इयत्ता १० वीचे प्रमाणपत्र |
| वाहनचालक | उमेदवाराने ऑनलाईन अर्जात उल्लेख केलेली सर्व शैक्षणिक व अनुभवाच्या कागदपत्रांची मुळ व एक झेरॉक्स प्रमाणित प्रत, उमेदवाराकडे मोटार वाहन अधिनियम १९८८ (क्र.५९/१९८८) प्रमाणे वैध व कार्यरत असा किमान हलके मोटार वाहन (एल.एम.व्ही.) चालविण्याचा परवाना (Driving Licence) असावा. जन्मतारखेचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला/इयत्ता १० वीचे प्रमाणपत्र |
| सुरक्षारक्षक | उमेदवाराने ऑनलाईन अर्जात उल्लेख केलेली सर्व शैक्षणिक व अनुभवाच्या कागदपत्रांची मुळ व एक झेरॉक्स प्रमाणित प्रत, उमेदवाराचे नावात बदल असल्यास (महाराष्ट्र शासन राजपत्र), जन्मतारखेचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला/इयत्ता १० वीचे प्रमाणपत्र |

**कागदपत्र पडताळणी/मुलाखत पत्र :**

१) मुलाखत पत्र ऑनलाईन पध्दतीने बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाईल. सदर मुलाखत पत्र ऑनलाईन पध्दतीने संकेतस्थळावरील उमेदवारांनी रजिस्टर केलेल्या लॉगीन आय.डी. वरून डाऊनलोड करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. मुलाखतपत्र डाऊनलोड करण्यास अडचणी निर्माण झाल्यास ८६००३००२७० व ९२२६८८०१९७ या मोबाईल नंबरवर किंवा support@adccbanknagar.in या ई-मेल आय.डी.वर संपर्क साधावा.

२) उमेदवारास मुलाखतीपुर्वी शैक्षणिक व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्राच्या प्राथमिक कागदपत्र पडताळणीसाठी बोलविले जाईल. त्यावेळी उमेदवाराने मुळ कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र होणाऱ्या उमेदवारास बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस बोलविण्यात येईल.

३) या प्राथमिक कागदपत्र पडताळणीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास तो मुलाखतीस तसेच नियुक्तीस पात्र रहाणार नाही.

**मुलाखत :**

- ऑनलाईन परिक्षेत पदनिहाय गुणानुक्रमे पात्र झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी होऊन कागदपत्र पडताळणीत पात्र होणाऱ्या उमेदवारास १० गुणांसाठी मुलाखतीस बोलविण्यात येईल.
- ५ गुण हे शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. बाबींसाठी असतील व ५ गुणांसाठी बँकेने गठीत केलेल्या समिती मार्फत मौखिक मुलाखत घेण्यात येईल.
- उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास, तो अंतिम निवडीस पात्र राहणार नाही.
- शैक्षणिक पात्रतेनुसार देण्यात येणारे ५ गुण खालीलप्रमाणे राहतील.



R. No. 24910 Dt. 3/10/1957 Head Office Ahmednagar

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | गुण |
|---|---|---|
| १ | एम.कॉम./एम.बी.ए. (बँकींग किंवा फायनान्स)/एम.ई. (संगणक) किंवा (आय.टी.)/एम.एस.सी.(अॅग्री)/एलएल.बी./एलएल.एम. किमान ६०% गुण मिळवुन उत्तीर्ण असल्यास | १ |
| २ | सीएआयआयबी/जेएआयआयबी/डी.टी.एल. (Diploma in Taxation Laws) | १ |
| ४ | जीडीसीअॅण्डए (किमान ५०% गुण मिळवुन पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण असावा) | १ |
| ५ | बँकेतील कामकाजाचा किमान तीन वर्षाचा अनुभव (पतसंस्था, निधी पतसंस्था, मल्टिस्टेट पतसंस्था, सर्व प्रकारच्या फायनान्स कंपन्या/संस्थांमधील अनुभव दाखला ग्राह्य धरण्यात येणार नाही) | २ |
| | **एकूण** | ५ |

**उमेदवारांची अंतीम निवड सुची -**

निवड समिती प्रतिनिधींनी मोजदाद केलेल्या मुलाखत गुणांची सरासरी अधिक शैक्षणिक पात्रतेनुसार मिळालेले गुण तसेच ऑनलाईन परिक्षेतील गुण यांची गुणानुक्रमे अंतिम निवड सूची तयार करण्यात येईल. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो निवडीस पात्र राहाणार नाही.

**सर्वसाधारण अटी व शर्ती -**

ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल, अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास, उमेदवाराची निवड भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१) उमेदवाराची संगणकाद्वारे ऑनलाईन परिक्षा प्रामुख्याने अहमदनगर जिल्ह्यातील केंद्रावर घेण्यात येईल. मात्र, आवश्यकतेनुसार जिल्ह्याबाहेरील इतरही जिल्ह्यातील केंद्रांवरही परिक्षा घेतली जाईल. (उमेदवारास जिल्ह्यातीलच केंद्रावर परिक्षा घेण्यात यावी, असा हक्क सांगता येणार नाही)

२) पात्रतेबाबतच्या खोट्या माहितीच्या आधारे ऑनलाईन अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास, अशा उमेदवारावर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येईल.

३) पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्याचे संपूर्ण अधिकार बँकेने राखून ठेवले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

४) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरून विहित परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रूपरेषा/वेळापत्रक/परिक्षा केंद्र/बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहाण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.



The Ahmednagar District Central Co-op Bank Ltd. R.No. 24910 Dt. 3/10/1957 Head Office Ahmednagar

५) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

६) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

७) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरिता शारिरीक क्षमतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, ०१ जुलै २००५ नुसार विहित केलेल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना(अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र बंधनकारक आहे.(मुलाखतीचे वेळेस)

९) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखाद्या अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास, कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१०) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती रद्द करण्यात येईल व बँकेची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

११) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

१२) ऑनलाईन परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस/मौखिक मुलाखतीस बोलविलेल्या उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१३) भरती प्रक्रिया/परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः त्यात बदल करणे, पदाच्या एकूण संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार बँकेस राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार बँकेस राहील. याबाबत उमेदवारास कोणताही दावा सांगता येणार नाही.

१४) ऑनलाईन परिक्षा, कागदपत्रे छाननी इ. करीता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेतस्थळावरूनच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब, सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/ कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

R.No. 24010 Dt. 3/10/1967 Head Office Ahmednagar

१५) परिक्षा केंद्रावर नेटवर्क संदर्भात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास व सदरहू अडचणीचे निवारण विहीत मुदतीत न झाल्यास व त्या कारणाने त्या तारखेची परिक्षा रद्द झाल्यास, संबंधीत उमेदवारांच्या परिक्षा इतर केंद्रावर किंवा त्याच केंद्रावर योग्य त्या तारखेस व वेळेस घ्यावयाचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत. अशा परिस्थितीत उमेदवारांच्या परिक्षेची तारीख, परिक्षा केंद्र व परिक्षेची वेळ या बाबत संबंधीत उमेदवारांना अलाहिदा त्यांचे ई-मेल आय.डी. व रजिस्टर्ड मोबाईल नंबरवर कळविण्यात येईल. तथापि, संबंधीत उमेदवारांना त्यांचे मोबाईल किंवा ई-मेल तांत्रिक अडचणीमुळे सदरहू संदेश प्राप्त न झाल्यास, अशा उमेदवारांनी याबाबतची माहिती भरतीच्या व बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून प्राप्त करून घ्यावयाची आहे.

१६) **अंतिम निवड झालेल्या उमेदवारास बँकेकडे किमान ३ वर्षे सेवा करणेबाबत बँकेने ठरवुन दिलेल्या नमुन्यात करार/हमीपत्र करून द्यावे लागेल.**

ठिकाण : अहमदनगर
दिनांक : १३.९.२०२४

**रावसाहेब लक्ष्मण वर्पे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**माधवराव सावळेराम कानवडे**
**व्हाईस चेअरमन**

**शिवाजीराव भानुदास कर्डिले**
**चेअरमन**

R.No.24910
Dt.3/10/1957
Head Office
Ahmednagar